+

# राष्ट्रीय सेवा योजना
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक,

**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**

उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित उपक्रम अहवाल

## मार्च २०१८

## शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८

१. मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८
२. प्राचार्य डॉ.डी.बी.शिंदे, मो.९४२२७५४५१२
३. कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.आर.निकम, मो.९४२०६९३६२६
४. स्वयंसेवक एकूण संख्या (एकूण युनिट)– २५० दोनशे पन्नास
५. कार्यशाळा शिबीर व्याख्याने इ. आयोजनात सहभागी संस्था
    १. Dr.Vasantrao Pawar Medical College, Vasantdadanagar, Adgaon, Nashik, Maharashtra – 422207 Phone:0253 230 3111

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**

**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,**

**उत्तमनगर सिडको, नाशिक– ४२२००८**

# नियमित उपक्रम अहवाल २०१७-२०१८

**माहे जून २०१७ –**

राज्यस्तरीय आव्हान २०१७ निवडचाचणी शिबिरात दि. १ जून ते १० जून २०१७ या कालावधीत कोल्हापूर शहरात संपन्न झाले. या शिबिरात नेहा चौधरी, आकाश तोटे व विशाल वाघुळदे या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. २३ जून २०१७ रोजी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने आयोजीत जागतिक ऑलम्पिक दौड दिन (World Olympic Run) मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील महाविद्यालयतील स्वयंसेवक व प्रा.रविराज वटणे यांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला.





**माहे जूलै २०१७ –**

१ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत महाविद्यालय परिसरात वन मोहत्सव साजरा करण्यात आला महाविद्यालय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले.

दि. १२ जुलै २०१७ रोजी डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिट च्या वतीने भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले यात ४७ स्वयंसेवकांनी रक्तदान केले आणि भव्य रक्तदान शिबिराच्या आयोजनात सहभाग नोंदविला.

**माहे ऑगस्ट २०१७ –**

दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत महाविद्यालयातील 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवाडा' साजरा करण्यात आला या पंधरवाड्या निमित्त महाविद्यालयात तसेच महाविद्यालयीन परिसरात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये स्वच्छतेच्या शपथेने पंधरवड्यातील उपक्रमस सुरुवात करण्यात आली तर पुढे महविद्यालयातील परिसरातील स्वच्छता मोहीम त्यांतर्गत सिडको परिसरातील राजे छत्रपती संभाजी क्रीडा संकुलात श्रमदान करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय योजनेचे प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.आर.निकम, डॉ.जयश्री जाधव, प्रा.रविराज वटणे व

स्वयंसेवकांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच या पंधरवड्यात महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता जनजागृती पर रॅली काढण्यात आली, परिसरातील झोपडपट्टीमध्ये येथे प्रत्यक्षात जावून स्वच्छता पर जनजागृती स्वच्छता सर्वेक्षण इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात रा.से.योजनेचे प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.आर.निकम, डॉ.जयश्री जाधव, प्रा.रविराज वटणे व स्वयंसेवकांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे सरांनी या स्वच्छता अभियानासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.





दि. १६ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट दरम्यान विद्यापीठस्तरीय वृक्षरोपण विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले त्यात पाटील विशाल, तनपुरे सोपान हे स्वयंसेवक सहभागी झाले.

१६ ते २० ऑगस्ट २०१७ या कालावधीत प्रेरणा-२०१७ राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे संपन्न झालेल्या शिबिरात आंधळे प्रतीक्षा नामदेव स्वयंसेविका सहभागी झाली होती.

१७ ऑगस्ट २०१७ ते २३ ऑगस्ट २०१७ दरम्यान "सलग समपातीळी चर प्रशिक्षण (CCT) शिबीर" आय कॉलेज इंदापूर, जि. पुणे येथे संपन्न झाले त्यात कु.गणेश दिलीप फडोळ व सिमा कुन्जीलाल बोपचे या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

३० ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयाच्या रा.से.योजना युनिटने मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने आयोजीत 'महा अवयवदान रॅली' मध्ये इदगाह मैदान गोल्फ क्लब येथे सहभाग नोंदविला.





**माहे सप्टेंबर २०१७ –**

दि. ०५ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नाशिक महानगरपालिका आयोजित 'गणेश मूर्ती दान' या उपक्रमात सहभाग नोंदवून गणेश विसर्जनाच्या दिवशी गणेश मूर्तींचे विसर्जन न करता ती दान करावी याची जनजागृती करत, गणेश मूर्ती संकलनामध्ये रा.से.यो. प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.आर.निकम, डॉ.जयश्री जाधव, प्रा.रविराज वटणे व सर्व स्वयंसेवकांनी मदत केली त्याच बरोबर महाविद्यालयाचे प्रा.सोमनाथ घुले सर व प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे सरांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी येऊन संकालनामध्ये मदत केली.






दि. २२ सप्टेंबर २०१७ रोजी नाशिक महानगरपालिका आयोजित स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान – स्वच्छता हिच सेवा महा स्वच्छता अभियानात महाविद्यालयाचे रा.से.योजना युनिट सहभागी झाले आणि शहरातील शालीमार परिसरातील स्वच्छता करण्यात आली या अभियानात स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवीत शहरातील परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.






दि. २४ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयात रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून – के.टी.एच.एम. महाविद्यालयाचे प्रा. अशोक सोनावणे यांना आमंत्रित करण्यात आले होते त्यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.







तसेच या कार्यक्रमात स्वयंसेवकांना या वर्षातील उपक्रम विषयी माहिती देण्यात आली. नवीन सहभागी स्वयंसेवकांचे स्वागत करण्यात आले त्याच बरोबर रा.से.योजनेच्या डायरी व बॅजेस चे वाटप करण्यात आले.

**माहे ऑक्टोबर २०१७ –**

२ ऑक्टोबर २०१७ रोजी महात्मा गांधीजींची १४८ वी जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली, या प्रसंगी प्रा. सोमनाथ घुले सरांनी मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वच्छतेविषयी माहिती सांगून महात्मा गांधीजींची जयंती संपन्न झाली.







या महिन्यात महाविद्यालयाच्या पुर्नमुल्यांकनासाठी 'NAAC' आले होते या कामामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटने उत्तम सहाय्य केले तसेच पुर्नमुल्यांकनामध्ये महाविद्यालयाला 'अ' श्रेणी प्राप्त झाली.

**माहे नोव्हेंबर २०१७ –**

दि. २६ नोव्हेंबर २०१७ रोजी महाविद्यालात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय पद भूषविले व प्रा.रविराज वटणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**माहे डिसेंबर २०१७ –**

दि. १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात १२५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन पार पडले व २१ डिसेंबर २०१७ रोजी समारोप करण्यात आला.





२९ डिसेंबर २०१७ रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शिबिरात स्थळ क.ग.द.मोरे महाविद्यालय निफाड येथे संपन्न झाले या शिबिरात आंधळे प्रतीक्षा, तनपुरे सोपान, पाटील विशाल, रोकडे प्राजक्ता, बागुल विवेक, वाघूळदे विशाल, चौधरी नेहा हे स्वयंसेवक उपस्थित होते.

**माहे जानेवारी २०१८ –**

३ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजामाता यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी प्रा.सोमनाथ घुले सर यांनी मार्गदर्शन केले.

दि. १२ जानेवारी ते जानेवारी दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात 'युवा सप्ताह' चे आयोजन करण्यात आले, युवा सप्ताहाची सुरुवात युवा दिना निमित्त डॉ.वसंतराव पवार मेडिकल कोलेजच्या मदतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात ४९ स्वयंसेवकांनी रक्तदान केले. तसेच साप्ताहमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, कविता लेखन स्पर्धा, घोषवाक्य लेखन स्पर्धा, इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये विजेत्या स्वयंसेवकांना पारितोषिके देण्यात आली.




तसेच युवा साप्ताह निमित्त व्याख्यानाचेही आयोजन करण्यात आले त्यावेळी उत्तर महाराष्ट्र विभगाचे दैनिक सकाळचे संपादक श्री श्रीमंत माने यांना बोलविण्यात आले त्यांनी 'समाज माध्यमे व युवक या विषयावर व्याखान दिले. त्यांनी विषयाची उत्तम मांडणी करत उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.




१६ ते १७ जानेवारी या कालावधीत त्र्यंबकेश्वर महाविद्यालय नाशिक येथे मूल्यशिक्षण अंतर्गत दोन दिवसीय जिल्हास्तरीय 'तलाव स्वच्छता कार्यशाळा' संपन्न झाली त्यात विशाल पाटील, वैष्णवी पांडे, प्रतीक्षा आंधळे, किरण वेताळ, या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. २४ जानेवारी २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात मतदार साक्षरता क्लब ची स्थापना करण्यात आली, त्या क्लबच्या वतीने महविद्यालयात व परिसरात वेगवेगळया जनजागृती पर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**माहे फेब्रुवारी २०१८ –**

१५ फेब्रुवारी रोजी मतदार साक्षरता क्लब अंतर्गत जनजागृती उपक्रमानमध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी रा.से.योजनेच्या स्वयंसेवकांनी मतदानाचा टक्का वाढावा यासाठी या विषयावर पथनाटयाचे सादरीकरण करण्यात आले .




२३ फेब्रुवारी २०१७ रोजी महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी प्रा.सोमनाथ घुले सर यांनी संत गाडगे महाराज यांच्या विषयी माहिती सांगितली.

**माहे मार्च २०१८ –**


८ मार्च २०१७ रोजी 'जागतिक महिला दिन्नानिमित्त' महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे सर तसेच प्रमुख पाहुणे पुष्पलता निमसे (पो.नी.) अंबड पोलीस स्टेशन नाशिक तसेच, नगरसेविका शीतलताई भामरे, अश्विनीताई बोरस्ते आणि रत्नमालाताई राणे तसेच इतर महिला उपस्थित होत्या त्यांनी सर्व विद्यार्थिनींना महिला दिनाचे महत्व सांगून मार्गदर्शन केले.





राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वर्षभर आयोजित या नियमित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.आर.निकम, डॉ.जयश्री जाधव, प्रा.रविराज वटणे यांनी

उत्सफुर्तपणे सहभाग घेतला तसेच प्रा. सोमनाथ घुले सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले, या सर्व नियमित कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे सरांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्वयंसेवकांच्या उत्तम प्रतिसादामुळे सन २०१७-२०१८ वर्षातील सर्व नियमित कार्यक्रम उत्तमरीतीने पार पडले.

रक्तदान शिबिरे एकूण सहभागी स्वयंसेवक संख्या- ११५ रक्तदान एकूण बॉटल्स संख्या- ९६
हिमोग्लोबिन तपासणी एकूण सहभागी संख्या- २१०
वृक्षरोपण एकूण संख्या- २८७ एकूण बीजारोपण- ००
या व्यतिरिक्त विशेष कार्यक्रम- ०० सहभागी स्वयंसेवक- २५०



**(प्रा.एस.आर.निकम)**
**रा.से.यो**
**कार्यक्रम अधिकारी**



**(डॉ.डी.बी.शिंदे)**
**प्राचार्य**